# दोंडाईचा रेल्वे स्टेशन परिसरात अनोळखी मृतदेह आढळला

■ दोंडाईचा । श.प्र

दोंडाईचा रेल्वे स्टेशन प्लॅटफॉर्म क्रमांक एक वर अनोळखी व्यक्तीचा मृतदेह आढळला.

लोहमार्ग पो.स्टे. नंदुरबार अ.मृ.नं.०७/२०२५ भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १९४ मधील अनोळखी मयत व्यक्ती वय अंदाजे ५५ वर्षे हा दि. १४ रोजी रात्री ८ वाजेपुर्वी रेल्वे स्टेशन दोंडाईचा ता. शिंदखेडा येथील प्लॉटफार्म क्रमांक १ वर वेटींगसमोर बेशुध्दावस्थेत मिळुन आला होता. त्यास उपचारार्थ उपजिल्हा रुग्णालय दोंडाईचा येथे दाखल करण्यात आले. दरम्यान वैद्यकीय अधिकारी यांनी त्या व्यक्तीला मयत घोषित केले आहे.

# अनधिकृत उद्योगधंदे हटविण्याच्या आमदारांच्या आदेशानंतरही 'जैसे थे'च

■ पाचोरा। प्रतिनिधी



पाचोरा शहरालगत असलेल्या नागरी वास्तव्यासाठी जारगाव येथील बिनशेती गट क्र.१३८/६ब/१ येथील जारगाव ग्रामपंचायत अंतर्गत सुदामा रेसिडेन्सीमध्ये अनधिकृत उद्योगधंद्यांमुळे तेथील नागरिकांना त्रास सहन करावा लागत होता. ते उद्योग बंद करण्यात यावे या मागणीसाठी तेथील नागरिकांनी १९ दिवसांपूर्वी तहसील कार्यालयाजवळ आमरण उपोषण सुरू केले होते. त्याठिकाणी आमदार किशोर पाटील यांनी भेट देत नागरीकांची मागणी समजून घेतली. दरम्यान त्यांनी हा कारखाना ८ दिवसात काढण्याचे आदेश दिले होते. परंतु, आजही तो कारखाना दिमाखात उभाच असल्यामुळे आमदारांचे आदेशही नाकारल्याची शोकांतिका व्यक्त केली जात आहे.

**सुदामा रेसिडेन्सी ही नागरी वास्तव्यासाठीच**

नागरी वसाहत प्रत्येक उद्योगधंद्यांसाठी प्रतिकुल ठरते. म्हणून तेथे काही अनधिकृत उद्योगधंदे सुरू झाले. यात आंबिका डेअरी, आंबिका मिल्क प्रोसेसिंग युनिट, सुधन हॉस्पिटल, नॅशनल मार्बल, ओरके.स्टाईल, धान्य साठवणूकीचे गोडावून, वेअर हाऊस , जलाराम ट्रेडर्स, आंबिका बर्फ फॅक्टरी विरोधात स्थानिक रहिवाशी मार्फत २०१९ पासूनच विरोध केला जात आहे. वर्षभरापासून तेथील दुर्गंधी, तुबलेल्या गटारी, अवजड वाहनांच्या वर्दळीमुळे झालेले खराब रस्ते, रात्र-दिवस सुरु आसलेले आंबिका मिल्क प्रोसेसिंग युनिट यामुळे नागरिकांना होणाऱ्या त्रासात भर पडली. त्यामुळे नागरिकांनी सात महिन्यांपासून शासनाकडे हे अनधिकृत उद्योग बंद करण्याची मागणी सातत्याने केली. वेळो-वेळी पाठपुरावा अन् आंदोलने करून ही कुठलीच कार्यवाही होत नसल्याने तेथील नागरिकांनी २७ जानेवारीला आमरण उपोषण सुरू केले होते. या उपोषणस्थळी आमदार किशोरपाटील यांनी भेट देत समस्या जाणून घेतली. त्यांना सुरु असलेले उद्योग अनधिकृत असल्याचे समजले असता तत्काळ अनधिकृत आंबिका डेअरीचे संचालक याला फोन लावून ताकिद देत हटवण्याचे देखिल सांगितले होते.

**१८ रोजी होणार सुनावणी**

सुदामा रेसिडेन्सीतील नागरिकांनी आंदोलन केल्यानंतर पाचोरा प्रांताधिकाऱ्यांनी १२ फेब्रुवारी रोजी सुनावणी घेण्यासाठी नागरिक व कारखानदारांना पत्र दिले होते. परंतु काही कारणास्तव सुनावणी होऊ शकली नाही. यासाठी पुन्हा १८ फेब्रुवारी ही तारीख जरी दिली असली तरी आमदार साहेबांच्या अदेशाचे पालन केले जात नाही. स्थानिक नागरीकांच्या आरोग्याची, जिवीताची समस्या, निर्माण करणाऱ्या अनधिकृत कारखानदारांवर कादेशीर कार्यवाही होईल का निर्णयाची उत्सुकता निर्माण झाली आहे.

**आता थेट कारवाईची गरज**

सात महिन्यांपासून नागरिकांनी सातत्याने पाठपुरावा, आंदोलने केली. ग्रामपंचायत जारगाव यांनी लेखी पत्र दिल्यावर व त्यानंतर सुनावणी होत आहे, यात प्रशासनाची दिरंगाई दिसून येते. अशी सुनावणी आधीच होणे अपेक्षित होते,अ ाता प्रशासनाने नागरिकांच्या समस्या लक्षात घेत थेट कारवाई करणे गरजेचे आहे ..

**किशोर डोंगरे,** जेष्ठ सामाजिक कार्यकर्ता नागरिक, सुदामा रेसिडेन्सी, जारगाव ता.पाचोरा.



# विकास लवांडे यांच्या बेताल वक्तव्यप्रकरणी यावल येथे निषेध

■ यावल। प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाच्या प्रदेश प्रवक्ता विकास लवांडे यांनी केलेल्या बेकार वक्तव्याच्या यावल येथे शिवप्रतिष्ठान हिंदुस्थान यावल तालुकाप्रमुख यांच्या सहकार्यकर्त्यांनी यावल पोलीस निरीक्षक प्रदीप ठाकूर यांना निवेदन देऊन लवांडे यांचा जाहीर निषेध केला आहे. १२ फेब्रुवारी २५ रोजी राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश प्रवक्ताविकास लवांडे यांनी कायदा व सुव्यवस्था संदर्भातची वक्तव्य केले. शिवाजी महाराजांविषयी काहीतरी अर्धवट इतिहास सांगायचा आणि तरुणांच्या भावना भडकवण्याचा प्रकार त्यांनी केला आहे.

भिडे गुरुजींविषयी जे वक्तव्य केले. त्यासंदर्भात या तरुणांच्या संतप्त भावना निवेदन देतेवेळी त्यांनी व्यक्त केल्या त्यामुळे हिंदू धर्माच्या भावना दुखावल्या गेल्या आहेत. असंही या निवेदनात नमूद केले गेले असून त्यांच्यावर कठोर आपले कठोर कारवाई व्हावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली. याप्रसंगी शिवप्रतिष्ठान हिंदुस्थान यावल तालुका प्रमुख सागर लोहार, स्वप्निल करांडे, सागर कोळी, राज शिर्के, मयूर शिर्के , पार्थ सोनवणे, कमलेश शिर्के, भरत बारेला, सागर इंगळे यांच्यासह आदी उपस्थित होते.

# अमळनेर येथे रिक्षासह दोन लाखांचा गांजा जप्त

■ अमळनेर । प्रतिनिधी–

येथे गांजा विक्रीला आणणाऱ्या शिरपूर येथील एकाला रंगेहाथ पकडून त्याच्या जवळून गांजा व रिक्षासह २ लाख ८० हजाराचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. एलसीबी सह स्थानिक पोलीस यांनी १४ रोजी रात्री साडे नऊ वाजता संयुक्त कारवाई करून आरोपीला अटक करण्यात आली आहे.

पिवळ्या रंगांच्या रिक्षा क्रमांक एम एच १८ , ए जे ३७९२ मधून गांजा विक्रीसाठी आणला जात असल्याची माहिती एलसीबी पोलिसांना मिळताच त्यांनी पारोळ्याचे पोलीस निरीक्षक सुनील पवार यांना सांगितली. पवार यांच्यासह सहाय्यक पोलीस निरीक्षक रवींद्र पिंगळे, नायब तहसीलदार प्रशांत धमके , पोलीस उपनिरीक्षक नामदेव बोरकर, एलसीबी पोलिस रवींद्र पाटील, दीपक माळी, गणेश वाघमारे यांच्यासह जितेंद्र निकुंभे, सुनील महाजन, अमोल पाटील यांना छापा टाकण्यासाठी पाठवले. सर्व पथकाने चोपडा रस्त्यावर आसाराम बापू आश्रमाच्या बाजूला रस्त्यावर सापळा लावून ठेवला.

रात्री ९ वाजून २५ मिनिटांनी चोपड्याकडून पिवळ्या रंगाची ती रिक्षा येताना दिसली. रिक्षा चालकाने त्याचे नाव कोमलसिंग विकास राजपुत वय २९ रा भोरखेडा ता शिरपूर असे सांगितले. त्याच्याजवळील रिक्षामध्ये गोणीत १ लाख ८० हजार रुपये किमतीचा १८ किलो ३२८ ग्राम गांजा आढळून आला.

कोमलसिंग याला गांजा आणि १ लाख रुपयांची रिक्षा असा एकूण २ लाख ८० हजार रुपयांच्या मुद्देमाल सह अटक करण्यात आली. रवींद्र पाटील यांच्या फिर्यादीवरून अमळनेर पोलीस स्टेशनला एनडीपीएस कायदा १९८५ चे कलम ८क, २० ब, २(क) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला.

# एरंडोल येथे जनावरांचे मांस आढळल्याने खळबळ

## महादेव मंदिरानजीकचा कत्तलखाना जमीनदोस्त करण्याची मागणी

■ एरंडोल । प्रतिनिधी–

येथे १३ फेब्रुवारी २०२५ रोजी सायंकाळी साडेचार वाजेच्या सुमारास अंजनी नदीच्या काठी असलेल्या जुन्या कत्तलखान्यात गोवंश व म्हैस जातीचे जनावरांचे कत्तल केलेले अदमासे १५ किलो मांस, अवशेष, शिंगे मिळून आल्याने एकच खळबळ उडाली या प्रकरणी एरंडोल पोलीस स्टेशनला अज्ञाता विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

कोणीतरी अज्ञात व्यक्तीने अवैधरित्या गोवंश व म्हैस जातीचे जनावरांचे कत्तल करून अंदाजे १५ किलो मांस अवशेष शिंगे जागेवर सोडून दिले.

दरम्यान सदर कत्तलखाना आठवडे बाजारातील महादेव मंदिरालगत असून तो बेकायदेशीर आहे म्हणून सदर कत्तलखाना तात्काळ उध्वस्त करावा अशी मागणी समस्त हिंदू समाज बांधवांतर्फे पोलीस स्टेशन, उपविभागीय अधिकारी, नगरपरिषद यांच्याकडे दिलेल्या निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. या ठिकाणी बऱ्याच वर्षापासून बेकायदेशीर कत्तलखाना नियमित सुरू असून परिसरातील रहिवाशांनी वेळोवेळी तोंडी व लेखी तक्रारी देखील केले आहेत परंतु कोणतीही कारवाई या कत्तलखान्यावर अद्याप पर्यंत झालेली दिसून येत नाही असे निवेदनात नमूद केले आहे.

विशेष म्हणजे अंजनी नदीच्या काठी हा कत्तलखाना असल्याने कत्तलखान्यातील गोवंशा चे रक्ताचे दूषित पाणी अंजनी नदी पात्रात सोडले जात आहे त्यामुळे आरोग्याच्या दृष्टीने हे घातक आहे. असे निवेदनात म्हटले आहे.

# मनोरुग्ण महिलेची वेले येथील मानवसेवा तीर्थ येथे रवानगी




■ पारोळा । प्रतिनिधी

पारोळा पोलीस स्टेशन हद्दीत अंदाजे २८ वर्ष वयाची महिला हीस बोलता किंवा नाव गाव सांगता येत नाही अशी महिला मिळुन आली असुन सदर मनोरूग्ण महिला हिस महिला दक्षता समिती सदस्य सुवर्णा वसंत पाटील, सुनंदा गजानन शेंडे व पोलीस पाटील हिरापुर ता. पारोळा अमित चंद्रकांत सोनवणे हे सदर महिला मनोरूग्ण हिस आपले मानव सेवा तीर्थ वेले येथे दाखल करण्यासाठी घेवुन येत असल्याने सदर महिला हिस पुढील उपचारासाठी दाखल करण्यास यावे असे आदेश पारोळा पोलीस निरीक्षक सुनील पवार यांनी व्यवस्थापक मानव सेवा तीर्थ वेले ता. चोपडा यांना दिल्यानुसार पोलिसांच्या माध्यमातून महिला दक्षता समितीच्या सदस्या सुवर्णा वसंत पाटील सुनंदा शेंडे हिरापूर पोलीस पाटील अमित पाटील यांनी सदर महिलेस वेले येथे पुढील उपचारार्थ सोडले असून यापूर्वी देखील सुवर्णा पाटील यांनी अनेक अनाथ महिला वृद्ध मुलं मुली अशांना शोधून स्वखर्चाने त्यांची साफसफाई करून पोलिसांच्या माध्यमातून वेले तालुका चोपडा येथे सोडले आहे.

पान १ वरुन ...

## युवांना अनुभवाचा सल्ला

गणितज्ञ आणि तत्वज्ञदेखील होते. मानवी मेंदू हा संगणक नाही. तो त्यापेक्षा अधिक जटील आहे, असे ते म्हणत. साधनांचा वापर करणे गैर नाही. तथापि युवा पिढीतील अनेक जण कृत्रिम बुद्धिमत्तेच्या आहारी जाऊ शकतील का? कोणत्याही मुद्यावर विचार करणे, आव्हानांवर प्रयत्नांनी मात करणे विसरतील का? यातायात करण्यापेक्षा कृत्रिम बुद्धिमत्तेकडून विनासायास समस्या सोडवून घेण्याची सवय लागू शकेल का? अशी भीती संशोधकही सातत्याने व्यक्त करतात. ती खरी ठरण्याचा धोकाही त्यांना जाणवतो. त्या धोक्याचे मूळ एका सामाजिक सवयीत दडलेले असू शकेल. लोक मोबाईल-त्यावरील समाजमाध्यमे यांच्या आहारी जात आहेत. किंबहुना गेले आहेत. परिणामी माणसाची एकाग्रता, ग्रहणशक्ती, स्मरणशक्ती, विचार करणे, तर्कसंगतता अशा अद्वितीय क्षमता क्षीण होत आहेत याकडे संशोधक सातत्याने लक्ष वेधून घेतात. याचा क्रिटिकल थिंकिंग वर परिणाम होणे अपरिहार्यच नाही का? कृत्रिम साधनांमुळे माणूसच बिनकामाचा ठरणे म्हणजे सामाजिकतेचा तोल ढासळणे होय. तेव्हा, माणूस तंत्रज्ञानात प्रगती करतच राहिल. पण मानवी मेंदूच्या जटिलतेचा-क्षमतांचा विसर त्याला पडू नये आणि तंत्रज्ञानाचा भस्मासुर होऊ शकेल याचा विसर पडू नये इतकेच.

## मंत्री धनंजय मुंडे राजीनामा देणार?

तो स्वत:चा निर्णय घेतो. त्यावेळेस माझ्या सद्विवेक बुद्धिला ते पटलं नव्हतं, असं अजित पवार आज पत्रकार परिषदेत म्हणाले. त्यांच्या या वक्तव्यामुळे आता धनंजय मुंडे खरंच मंत्रिपदाचा राजीनामा देतील का? असा प्रश्न उपस्थित होतोय.

## लाडक्या बहिणींची संख्या आणखी घटणार!

उत्पन्न असणाऱ्या कुटुंबातील महिलांना राज्य सरकारकडून दर महिन्याला १५०० रुपयांची आर्थिक मदत केली जाते. महायुती सरकारची ही योजना राज्यातील गरिब कुटुंबांना खूप आधार देणारी ठरली. त्यामुळे खूश झालेल्या लाडक्या बहिणींनी महायुतीला पुन्हा विधानसभा निवडणुकीत निवडून दिलं. यानंतर आता लाडकी बहीण योजनेचा लाभ घेणाऱ्या महिलांची संख्या आता घटवली जात आहे. निकषांमध्ये न बसणाऱ्या लाडक्या बहिणींवर कारवाई केले जात आहे. अशा महिलांचे अर्ज बाद केले जात आहे. त्यामुळे त्यांना आता पुन्हा या योजनेचा लाभ घेता येणार नाही. पण सरकार त्यांच्याकडून दिलेले पैसे परत घेणार नाही हे देखील स्पष्ट करण्यात आले आहे.

## कुंभमेळ्याहून परततांना भाविकांवर काळाचा घाला

गोदले स्वामी (४०) रा. छत्रपती चौक नांदेड, जयश्री कुंडलिकराव चव्हाण (५०) रा.आडगाव रंजेबुवा ता.वसमत जि.हिंगोली अशी या मृत व्यक्तींची नावे आहेत. या अपघातात सोळा जण जखमी असून, त्यांच्या संपर्कात नांदेड पोलीस प्रशासन व जिल्हा प्रशासन असल्याची माहिती जिल्हाधिकारी कार्यालयाकडून देण्यात आली.कुंभमेळ्यातील स्नानासाठी काही मंडळींनी एकत्र येवून सदरची टेम्पो ट्रॅव्हलर बुक केली होती. कुंभमेळ्याचे स्नान आटोपल्यानंतर ही मंडळी अयोध्येकडे रवाना होत होती. त्याचवेळी हा अपघात घडला. या टेम्पो ट्रॅव्हलरमध्ये २३ यात्रेकरु असल्याची माहिती प्रशासनाकडून प्राप्त झाली आहे. जखमींची नावे अद्याप अप्राप्त आहेत.

## दिल्लीच्या मुख्यमंत्र्यांचा उद्या शपथविधी

होतील. भाजपने सोमवारी १७ फेब्रुवारी रोजी विधिमंडळ पक्षाची बैठक बोलावली आहे ज्यामध्ये मुख्यमंत्र्यांचे नाव निश्चित केले जाईल. सर्व आमदारांना कळविण्यात आले आहे. ही बैठक दिल्ली राज्य कार्यालयात होईल. केशव कुंज येथील नवीन कार्यालयाचे उद्घाटन १९ तारखेला होईल. संघ कार्यालयाच्या उद्घाटनाला भाजपचे मुख्यमंत्री सहभागी होतील. दिल्लीच्या मुख्यमंत्र्यांचा शपथविधी समारंभ निवडणूक निकालानंतर दहा दिवसांनी होईल.

**शुक्रवार १४/०२/२०२५**
मेन बाजार -
मिलन ना.-१५८-४५-१४०

**शनिवार १५/०२/२०२५**
मेन बाजार -
कल्याण-
मिलन डे -
मिलन ना.-

### कल्याण

| दि. | सोम | मंगळ | बुध | गुरु | शुक्र | शनि |
|---|---|---|---|---|---|---|
| १६-१२-२०२४ २१-१२-२०२४ | ५७८-०२-५८९ | ६९९-४०-२३५ | ११९-९२-३४५ | ११६-८५-७८० | ५६९-००-१३६ | ८००-८८-२६० |
| ३०-१२-२०२४ ०४-०१-२०२५ | ५८०-३९-१४४ | ३७९-९४-२५७ | २२९-३३-५९९ | ४४७-५८-१२५ | ३४४-११-४७० | १७८-६३-३३७ |
| ०६-०१-२०२५ ११-०१-२०२५ | ३८८-९१-१०० | १७८-६९-१३५ | ३५८-६०-१२७ | ४८८-०६-३४९ | ५६०-१२-६७९ | ३९०-२०-३७० |
| १३-०१-२०२५ १८-०१-२०२५ | १८०-९५-३५७ | १३८-२८-२७९ | २३६-११-५८८ | ६७९-२९-२७० | ३९०-२८-३५० | ४७०-१८-१८९ |
| २०-०१-२०२५ २५-०१-२०२५ | २५७-४७-४५८ | ८००-८३-१४८ | १४९-४५-३५७ | २६०-८०-१४५ | १५६-३३-६८९ | ४८९-१८-३६९ |
| २७-०१-२०२५ ०१-०२-२०२५ | २८९-९६-३४९ | ५८९-२५-२६७ | २५०-७८-३६९ | ३९०-५९-४७८ | ५८०-३०-५५० | २७०-९४-१६७ |
| ०३-०२-२०२५ ०८-०२-२०२५ | १३६-०८-१८९ | २६७-५५-३५७ | २८०-०४-२३९ | ६७८-१४-१४९ | १५९-५५-५९० | ३४८-५१-६७८ |
| १०-०२-२०२५ १५-०२-२०२५ | ३५९-७१-४७० | ३३६-२७-१७९ | ४८०-२१-१५५ | ६७९-२३-६७० | १८०-९५-३४८ | १३८-२९-२२५ |

### मिलन डे

| दि. | सोम | मंगळ | बुध | गुरु | शुक्र | शनि | रवि |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २३-१२-२०२४ २८-१२-२०२४ | ७८८-३४-२२० | ७७८-२०-२८० | १३४-८९-९०० | १५९-५१-५६० | ३९०-२७-३४० | ५८९-२८-४७७ | ● |
| ३०-१२-२०२४ ०४-०१-२०२५ | ५५८-८८-९९० | १४५-०६-१६९ | ३४८-५३-३३७ | ३६६-५९-१८० | ३९०-२१-११९ | १५९-५९-३७९ | ● |
| ०६-०१-२०२५ ११-०१-२०२५ | १३९-३२-२३७ | ३८८-९५-७८० | १५०-६७-१७९ | ४४९-७१-१२८ | १६९-६७-३५९ | १६८-५२-१५६ | ● |
| १३-०१-२०२५ १८-०१-२०२५ | १५७-३९-१२६ | ४६६-६८-४४० | २६८-६८-१३४ | २७९-८३-१४८ | ३६६-५६-२४० | १५७-३७-४५८ | ● |
| २०-०१-२०२५ २५-०१-२०२५ | ३६०-९२-६६० | १७८-६३-६८९ | २७७-६०-५६९ | ४९०-३८-५५८ | १४६-१०-५६९ | २७७-६०-२८० | ● |
| २७-०१-२०२५ ०१-०२-२०२५ | ६७९-२२-११० | ३४८-५९-९०० | ४७७-८८-५५८ | १७८-६७-२६९ | १३५-९९-१२६ | १८०-९१-५६० | ● |
| ०३-०२-२०२५ ०८-०२-२०२५ | १७०-८५-८८९ | १२३-६४-५९० | २३९-४०-४७९ | ५९०-४८-१७० | २३७-२१-२४५ | २७७-६०-२९९ | ● |
| १०-०२-२०२५ १५-०२-२०२५ | ७८९-४९-५६८ | ५७०-२३-१५७ | ३३६-२०-५७८ | १६६-३८-२३३ | १७८-६४-२३९ | ६६९-१३-३३७ | ● |

### मिलन नाईट

| सोम | मंगळ | बुध | गुरु | शुक्र | शनि |
|---|---|---|---|---|---|
| १४०-५८-३३९ | १२५-८५-२६७ | ११६-८२-५८९ | १४७-२७-८९० | २४९-५५-४५६ | ३५६-४६-३५८ |
| ३४५-२८-१३४ | १६९-६९-३६० | १९९-९८-२३३ | ६७८-१९-१८० | १३०-४६-१५० | १६९-६८-३५० |
| ५६७-८१-६७८ | ४७९-०३-२४७ | ४८०-२४-१३० | १६९-६७-३५९ | ५७९-१९-३६० | ४९०-३८-३६९ |
| ४८०-२६-८८० | २७८-७२-१५६ | १२७-०८-४६८ | २३५-०७-१६० | २६०-८८-१८९ | १४०-५६-२५९ |
| १४०-१६-१६७ | १३७-१९-३८८ | १७९-७०-४६० | २६८-६६-१७८ | २५८-५४-४४६ | १५६-२०-४७९ |
| ५६९-०८-१३४ | ३५७-५४-११२ | १७९-७४-७७० | १५८-४३-३३७ | ३३७-३३-१२० | ४६७-७३-३४६ |
| १७७-५३-१२० | ५८९-२९-२२४ | ११०-२४-२६६ | २४७-३५-१६८ | ३८९-०४-३४७ | १४५-०९-४७८ |
| २३५-०२-२४६ | १३६-०८-८०० | ३६६-५५-२६७ | ४९९-२९-१८० | २३४-९८-३५० | १५८-४५-१४७ |

**नशिबाची परीक्षा**
सोमवार १७/०२/२०२५

* मिलन डे *
१७० २६० ४४० — ८-९ — २७० ४५० १४४ | सिंगल ८-४-७
जोड ८१-२९-४१-३७-९५

* कल्याण बाजार *
१२९ ४८० ६६० — २-३ — १२० ४९० ६७० | सिंगल २-७-०
जोड २६-९३-७४-०८-३१

* मुंबई (मेन) बाजार *
१७९ ४६७ ७०० — ७-४ — १३० २४७ २२० | सिंगल ७-१-८
जोड ७०-३४-२१-८९-४५

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष शास्त्रावर आधारीत आहे. कोणीही दुरुपयोग करु नये मो.९९७५४७९८२६

**दारुबंदीचा गुरुमंत्र**

द ग्रेट साईटिस्ट... (best doctor & gold medal awarded) डॉ.पालवे ॲडमिट करा... ।। नका करु... पेशंटला सांगा....।। नका सांगू.... पेशंटला आणा.... ।। नका आणू.... * व्यसन पेशंटचे... विश्वास तुमचा... उपचार आमचे... Lifelong व्यसनापासुन १०० टक्के मुक्ती.... सर्व सुविधांनी परिपूर्ण:- * व्यसनमुक्ती Special पॅक, मेडिसीन, इंजक्शन स्प्रे, ड्रॉप, ऑपरेशन, गोळी टाकणे, मंत्रोपच्चार... ॲडमिट सुविधा... * (विशेष) गरिबांसाठी फीमध्ये सवलत... तर आजच संपर्क :- ९५५२६१९७५२. डॉ. पालवे नशामुक्ती केंद्र, वरणगाव. (६४६२/व्ही.एम./०९/०१/२६)(CRINV-2425JL/CRG00504)

**१००% व्यसनमुक्ती**

* गॅरंटीने सोडवा. दारु + गुटखा + सिगारेट + बिडी + मावा + तंबाखु + बार + खैनी + भांग + गांजा + अफिम + जर्दा + ताडी + स्नेकबाईट + व्हाईट पावडर + व्हाईटनर + हिरॉईन + चरस + कोकेन + एमडी + एल.एस.डी.डॉट पेपर + झोपेची गोळी + इंजेक्शन... डॉ. पालवे नशामुक्ती केंद्र, वरणगाव मो.९५५२६१९७५२,www. drpalve nashamuktikendra.in १००% रिझल्ट. (६४६३/व्ही. एम./०९/०१/२६) (CRINV-2425JL/CRG00503)

**उपचार सर्वांसाठी सर्व आजारांसाठी**

जुनाट सर्दी, जुनाट दमा, जुनाट गुडघेदुखी, चालता, बसता, उठता न येणे. जुनाट संधीवात / चिकून गुनिया, जुनाट ॲलर्जी, जुनाट अर्धशिशी, जुनाट मुळव्याध, एचआयव्ही, भुक लागत नाही?, वजन कमी? थकवा जाणवतोय?, LOW CD4 COUNT? उपचार सर्वांसाठी, सर्व आजारांसाठी. भेटा - अहमदनगरचे सुप्रसिध्द डॉक्टर पालवे, वरणगाव मो.नं. ९५५२६१९७५२ (६४६४/व्ही. एम./ ०९/०१/२६) (CRINV-2425JL/CRG00505)

**देशदूत**

धुळे आवृत्तीसाठी छोट्या जाहिरातील रु.५/- प्रतीशब्दाप्रमाणे स्वीकारल्या जातील. शब्दाची किमान मर्यादा १५ व कमाल मर्यादा ४०. सतत तीन दिवस दिल्यास चौथ्या, पाचव्या व सहाव्या दिवशी विनामूल्य. जाहिरातीच्या मजकूर दै. 'देशदूत'च्या छोट्या जाहिरातीच्या फॉर्मवर सुबक अक्षरात लिहून दै. 'देशदूत', 'देशदूत कार्यालय' राणी मेडीकल शेजारी, ग.नं. ६ ,धुळे ४२४००१. संपर्क धुळे-२३७९१४ फॅक्स २३८९१४.

**सूचना**

वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातीतील मजकुराची शहानिशा करुनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात, त्याची 'देशदूत' वृत्तपत्र समूह कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पूर्तता जाहिरातदाराकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल 'देशदूत' वृत्तपत्र समुहाचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.